## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल केलेला तक्रार अर्ज

तक्रार क्र.रामाआ-७८/२०१८/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| शरद चंद्रकांत मुरडे | अधिक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग, पुणे | सहाय्यक धर्मदाय आयुक्त-३, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग, पुणे |

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक- ०४- १०- २०२४**

तक्रारदाराने आयोगाकडे दि.१७/४/२०१८ रोजी कलम १८ अन्वये तक्रार अर्ज केला. त्यामध्ये त्यांनी, आयोगाचे द्वितीय अपिल क्र.३१७६/२०१६ दि.१२/१/२०१८ चे आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, अशी तक्रार केली आहे.

आयोगाने द्वितीय अपिल क्र.३१७६/२०१६ मध्ये दि.१२/०१/२०१८ रोजी आदेश दिले की, जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय पुणे यांना एक आठवडयाच्या, शेड्युल १,२ व १० च्या छयांकित प्रती रजिस्टर पोस्टाने विनामूल्य पुरवाव्यात.

या प्रकरणात दि.१/१२/२०२३ रोजी सुनावणीचेवेळी तक्रारदार काहीही सुचना न देता अनुपस्थित होते. आजदेखील ते कोणतीही सुचना न देता अनुपस्थित आहेत.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी श्रीमती क्रांती जाधव, हजर होते. त्यांनी सुचित केले की, तत्कालिन या प्रकरणात तक्रदारदास माहिती दिली आहे. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री. व्ही.व्ही. गोसावी होते ते आता सेवानिवृत्त झाले आहेत.

तक्रारदाराने त्यांचे म्हणणे अथवा कोणताही खुलासा आयोगास सादर केला नाही. त्यामुळे, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अर्जदाराचा तक्रार अर्ज अमान्य करुन निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. 5903/2024 दिनांक - 15/10/2024

रामाआ-पुणे/२०२४-LSG